# कृषि संशोधन केन्द्र
अचलपुर जि. अमरावती (महा.)-४४४८०६
(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)

दुरध्वनी- ०७२२३ २२०११९

जा. क. कृ. सं. के / ५०९ /२०१८
दिनांक २९ /११/२०१८

## लिलाव सुचना

कृषि संशोधन केन्द्र, अचलपुर येथील प्रक्षेत्रावरील एकुण ५५ बाभुळ प्रजातीची मध्यम व मोठी जिवंत झाडे खुल्या लिलाव पदधतीने विकी करावयाची आहे. सदर लिलाव दि. १२ /१२/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता प्रक्षेत्र कार्यालयात आयोजित केला आहे.

**लिलावात भाग घेण्यासाठी अटी व शर्ती :**

1. इच्छुक खरेदीदारांना बोलीत भाग घेण्यापुर्वी रू. १००००/–अनामत रक्कम नगदी जमा करणे आवश्यक राहील व बोली रु. १००० च्या फरकाने बोलावी लागेल.
2. बोली अंतीम झाल्यानंतर इतर खरेदीदार रक्कम परत करण्यात येईल व ज्यांचे नावे बोली पुर्ण होईल त्यांची रक्कम बोलीचे रक्कमेत समायोजित करण्यात येईल.
3. बोली अंतीम झाल्यानंतर दि. १४/१२/२०१८ पर्यंत बोलीच्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम भरावी लागेल. उर्वरीत रक्कम २१/१२/२०१८ पर्यंत नगदी किंवा डीमांड ड्राफ्ट द्वारे जमा करावी लागेल. पुर्ण रक्कम जमा केल्याशिवाय झाडांची कटाई करता येणार नाही.
4. झाडांची कटाई ०५/०१/२०१९ पुर्वी पुर्ण करावी लागेल.
5. झाडे वाहुन नेतांना प्रक्षेत्रावरील चौकीदारांकडुन वाहन तपासणी/नोंदणी करूनच नेता येईल.
6. प्रक्षेत्रावरील फक्त चिन्हांकित बाभुळ झाडेच तोडता येतील, इतर वृक्षांना नुकसान होणार नाही किंवा झाडे कापली जाणार नाहीत याची खबरदारी घ्यावी लागेल अन्यथा लिलाव रद्द करण्यात येईल .व भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल.
7. लिलावातून अपेक्षित रक्कम प्राप्त न झाल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखाकडे राहील.
8. वृक्षतोड/वाहतुक करतांना खरेदीदारास किंवा त्यांचे कामगारास काही नुकसान/हानी झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील. त्याकरिता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
9. ज्यांचे नावे अंतीम बोली झाली त्यांनी उर्वरीत रक्कम न भरल्यास अनामत रक्कम किंवा ५० टक्के रक्कम कोणत्याही परिस्थितीस परत करण्यात येणार नाही.
10. लिलावाद्वारे विकीसाठी उपलब्ध असलेल्या प्रक्षेत्रावरील बाभुळ झाडांची पाहणी/अवलोकन कार्यालयीन वेळेत कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने दि. ०५/१२/२०१८ पासुन करता येईल.
11. सदर लिलावाच्या अटी व शर्ती लिलाव घेणाऱ्यास लिलावाच्या दिवशीच रू. १००/– च्या स्टॅम्प पेपरवर दोन साक्षीदारानिशी लिहुन दयाव्या लागतील.
12. बाभुळ झाडांच्या कटाई नंतर उर्वरित काटेरी फांद्या/अवशेष सुध्दा उचलून न्याव्या लागतील/ त्यांची योग्य विल्हेवाट लावावी लागेल.
13. वृक्षतोड करतांना प्रक्षेत्राचे, उभ्या पिकाचे विजेच्या तारांचे, भुमिगत पाईपलाईनचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. अन्यथा नुकसान झाल्यास भरपाई करून द्यावी लागेल.
14. लिलाव मंजुर करण्याचा किंवा रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार कार्यालय प्रमुख यांनी स्वतःकडे राखुन ठेवला आहे.
15. लिलावाकरिता उपलब्ध बाभळीच्या एकुण ५५ झाडांची सरकारी किंमत रू. १,६९,२००/– राहील.

प्रभारी अधिकारी,
कृषि संशोधन उप केंद्र, अचलपूर